AvianMedia

Navshakti
Thursday, September 17th, 2009 (Mumbai)
Page No- 12

# भारत-दक्षिण आफ्रिका सामन्याचे थेट प्रक्षेपण

मुंबई : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात 'डेव्हिस चषक' जागगिक गटामधील लढतीचे 'निओ स्पोर्ट्स'वरुन थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. जोहान्सबर्ग येथील 'एलिस पार्क इंडोर'येथील कोर्टवर हे सामने खेळण्यात येणार आहेत. सलामीच्या दिवसाचे प्रक्षेपण १८ सप्टेंबर रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन पासून सुरु होईल. तर दुसऱ्या दिवसाचे प्रक्षेपण संध्याकाळी साडेचारपासून सुरु होईल. भारतीय संघात सोमदेव देववर्मन, रोहन बोपन्ना, महेश भूपती आणि युकी भांब्री यांचा समावेश आहे. लिअँडर पेसने कोपराच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतल्याने युकीला स्थान देण्यात आले. दक्षिण आफ्रिका संघात रिकडी वोएस्ट, इझॅक वँडरमर्वी, वेस्ली मूडी आणि जेफ कोएट्झी यांचा समावेश आहे.

www.a... om
Office no. 26, Shubda Co.Ho... /, Opposite the RTO Office,
Pochkanwala Ro... umbai – 400030